# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि. रायगड-४१० २०६.**

ई-मेल पत्ता :- jtdire.१११५@gmail.com    दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४५३८२०)


जा.क्र.: विससं/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/२०१६ 3785    दि. 10/11/16

**अत्यंत महत्वाचे परिपत्रक**

प्रति,

प्राचार्य,

सर्व अधिनस्त शासकीय अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित (टप्पा अनुदानावरील)

कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालये,

जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

**विषयः ई.बी.सी. सवलत योजनेच्या ऑनलाईन अंमलबजावणीबाबत...**

संदर्भः १. या कार्यालयाकडून दि.२०.१०.२०१६ रोजी ई-मेलव्दारे पाठविण्यात आलेले मा.संचालनालयाचे परिपत्रक क्र. उशिसं/ई.बी.सी.सवलत/शिष्य./२०१६/, दि.२०.१०.२०१६

२. मा.संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/ई.बी.सी.सवलत/शिष्य./२०१६/१२७३३, दि.०८.११.२०१६

उरोक्त विषयास अनुसरुन संदर्भ क्र.१, व २ अन्वये कळविण्यात येते की, सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून सदर सवलत योजना ऑनलाईन पदधतीने राबविण्यात येत आहे. याबाबत मा. संचालनालयाकडून http://ebc.dhemaharashtra.in हे संकेतस्थळ आवश्यक प्रक्रियेच्या सर्व माहितीसहउपलब्ध करुन दिलेले आहे.

तरी सदर योजनेबाबत खालील वेळापत्रकानुसार कार्यशाळेचे आयोजन केलेले आहे. सदर कार्यशाळेस संबंधित योजनेचे कामकाज पाहणारे लिपिक यांनी व्यक्तिशःउस्थित रहावे. (अन्य प्रतिनिधीस पाठवू नये).

| अ. क्र. | जिल्हा | वार, दिनांक व वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | ठाणे, पालघर | गुरुवार दि. १७.११.२०१६, सकाळी ठिक ११.०० वाजता | के. जी. जोशी कला आणि एन. जी. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय, चेंदणी, जि. ठाणे |
| २ | रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग | शनिवार दि. १९.११.२०१६, दुपारी ठिक ०२.०० वाजता | डी. बी. जे. महाविद्यालय, चिपळूण, जि.रत्नागिरी |

**महत्वाच्या सूचना**

१. रायगड जिल्हयातील ज्या महाविद्यालयांना चिपळूण महाविद्यालयाच्या कार्यशाळेस उपस्थित रहाणे शक्य नसेल त्यांनी दि.१७.११.२०१६ च्या कार्यशाळेस उपस्थित रहावे.

२. सदर कार्यशाळेची उपस्थिती अनिवार्य असून गैरहजर महाविद्यालयांची नावे मा. संचालनालयास कळविण्यात येतील.

३. जर एखाद्या विद्यार्थ्याने अर्जात भरलेली माहिती चूकीची दिसून येत असेल व ती आपले स्तरावरुन **Edit** होत नसेल तर सदर अर्ज थेट **Reject** न करता **Defect** मध्ये टाकून सदर विद्यार्थ्यास ती चूक सुधारण्याची संधी देण्यात यावी. तदनंतर सदर विद्यार्थ्याने ती चूक दुरुस्त केल्यास तो अर्ज पुनश्चः आपले स्तरावरुन तपासणी करुन **Verify** करण्यात यावा.

४. या योजनेकरीता अर्ज करतांना विद्यार्थ्यांची कोणतीही कागदपत्रे या कार्यालयास जमा करावयाची नसल्याने या कार्यालयामार्फत केली जाणारी अर्जांची तपासणी ही केवळ आणि केवळ महाविद्यालयांनी / संस्थांनी केलेल्या तपासणीच्या आधारे होत असल्याने महाविद्यालय / संस्था यांचेकडून सदर शिष्यवृत्तीचे अर्जांची तपासणी काळजीपूर्वक व जबाबदारीने करण्यात यावी. अन्यथा भविष्यात काही चूकीची माहिती उघड झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्य, महाविद्यालय / संस्था यांची राहील याची नोंद घ्यावी.

RBhoslay
10/11/16

विभागीय सहसंचालक,

उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल.

प्रतः मा.संचालक,उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१ यांना माहितीस्तव सादर.